Royal Education Society's
[ Govt. of Maharashtra approved, affiliated to S.R.T. Marathwada University, Nanded and included under Section 2(f) and 12 (B) of U.G.C. Act 1956 ]
COCSIT
COLLEGE OF COMPUTER SCIENCE AND INFORMATION TECHNOLOGY, LATUR.
संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर. (कॉक्सिट)
COCSIT Campus, Ambajogai Road, LATUR- 413531 (Maharashtra)
Ph.: 02382 - 229191, 227779, Fax : 02382 - 228646, Website : www.cocsit.org.in, E-mail : cocsit365@rediffmail.com
Dr. M. R. Patil
President
Dr. N. S. Zulpe
I/c. Principal

संदर्भ :

दिनांक :

# Swami Ramanand Teerth Marathwada University 'Dnyanteerth' Vishnupuri Nanded -431606

Circular No: 1/Acad/ PG/UG- Admission process/2002-2003

All the affiliated Principals are informed that, from June 2002, admission procedure of BA, B.com, B.Sc, BCA and BBA First Year admissions should be concern with present University Eligibility Section given circular No-2/ Acad/ Eligibility / Admission / Procedure / 2001-2002 / 280-429 dated on 15th June 2001. Also Circular No.1 / Acad / Eligibility / Procedure/ 2001-02 / 430/579 dated on 19th June 2001 Rules and regulation and copy to concerned departments.

Provisions for reserved seats:

As per the government rules 50 % seats should be reserved for category and other category students, this reservation should not be more than total admissions in the institution.

| | | |
|---|---|---|
| 1. | SC/ST and Converted into Buddhism | 13 % |
| 2. | ST | 7 % |
| 3. | VJ | 3 % |
| 4. | NT - B ( NT - 1 ) | 2.5 % |
| 5. | NT - C ( Dhangar - NT - 2 ) | 3.5 % |
| 6. | NT - D (Vanjari - NT -3 ) | 2.0 % |
| 7. | OBC & Special Backward Class | 19% |
| | Total | 50% |

'Dnyanteerth' campus
Vishnupuri, Nanded – 431 606
Ref. No. 1/ Acad/ PG/UG- Admission process/2002-2003 Date : 18/05/2002

SD/-
Director
Board of college and University Development

Enclo: As above copy furnished to :-

1. Hon. Registrar office, SRTMU .
2. Hon. Exam controller office, SRTMU.
3. Principal, all affiliated colleges, SRTMU.
4. Dy. Registrar, PG section, SRTMU.
5. Assistant Registrar Dept. of Eligibility, SRTMU.
6. System Expert, UGC, SRTMU.

Translation Certified by : Principal

I/C. PRINCIPAL
College of Computer Science
and Information Technology, Latur

Scanned by CamScanner

☎ : (०२४६२)२९२४२-४३
फॅक्स (०२४६२)२९२४५

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६

परिपत्रक क्रं. 1 /शैक्षणिक/पदव्यूत्तर/पदवी-प्रवेश-प्रक्रिया/2002-2003

या परिपत्रकाद्वारे सर्व संलग्न महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सुचीत करण्यात येते की जुन 2002 पासुन बी.ए.,बी.कॉम, बी.एस.स्सी., बी.सी.एस.,बी.सी.ए. व बी.बी.ए. प्रथम व प्रवेश प्रक्रिया प्रस्तुत विद्यापीठाच्या पात्रता विभागाने निर्गमीत केलेले परिपत्रक क्रंमा 02/शैक्षणिक/पात्रता/प्रवेश/नियमावली/2001-2002/280-429, दि. 15.6.2001 तसेच क्रंमाक शैक्षणिक/पात्रता/नियमावली/2001-2002/430-579, दि. 19.6.2001 मधील तरतुदी अधिन राहून सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेल्या प्रवेश नियमावली व प्रक्रिया प्रमाणे करण्यात यावी. हि बाब सर्व संबधिताच्या निदर्शनास आणुन दयावी.

''ज्ञानतीर्थ'' परिसर
विष्णुपुरी, नांदेड - 431 606.
संदर्भ-पदव्युत्तर/पदवी-प्रवेश/2001-2002/12115-12276
दि. 18/5/2002

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

1) प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
2) परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
3) सहाय्यक कुलसचिव, शैक्षणिक विभाग,प्रस्तुत विद्यापीठ.
4) अधिक्षक, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहितीस्तव

1) मा.कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ.
2) मा.कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ.

Scanned by CamScanner

(०२४६२)२१२४२-४३

फॅक्स (०२४६२)२**४५

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६

---

## "परिशिष्ट"

### समान पदवी प्रवेश नियम व प्रक्रिया

1. बी.ए.,बी.कॉम, बी.एस.स्सी., बी.सी.एस.,बी.सी.ए. व बी.बी.ए. हया पदवी वर्गासाठी प्रवेश सर्व साधारणपणे गुणवत्तेच्या आधारे देण्यात यावे.
2. प्रवेश प्रक्रिया खालील प्रमाणे नियमीत राहील :-

अ) बारावी परीक्षांचे निकाल जाहिर झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत प्रवेशेच्छूक विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयात आपले नांव नोंदविणे आवश्यक राहील.

आ) नांव नोंदणीची मुदत संपल्यानंतर एका आठवडयाच्या आत वर्गनिहाय गुणवत्ता याद्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द् करून त्यांच्या प्रती विद्यापीठाकडेही माहितीस्तव पाठविणे आश्यक राहील.

इ) सर्व प्रवेश गुणवत्ता यादी प्रमाणे महाविद्यालयात उपलब्ध मान्यता प्राप्त वर्गनिहाय तुकडयांच्या एकूण प्रवेश क्षमते पर्यंतच मर्यादित असतील.

ई) गुणवत्तेच्या आधारे वर्गनिहाय प्रवेश क्षमतेचे 85% प्रवेश देणे आवश्यक आहे. (बी.सी.एस., बी.सी.ए. व बी.बी.ए. हया अभ्यासक्रमांना वगळून ) सर्व प्रवेश (जागा) शासन नियमानुसार राखीव संवर्गातील उमेदवारांसाठी आरक्षित राहतील. तसेच खुल्या आणि राखीव संवर्गातील उपलब्ध जागा पैकी 30 % जागा त्या त्या संवर्गातील महिला साठी आरक्षीत राहतील.

**<u>राखीव जागांची तरतुद -</u>**

शासनाच्या प्रचलित धोरणानुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या 50% जागा मागासवर्गीय व इतर घटकांसाठी खालील प्रमाणे राखीव राहतील. सदर आरक्षण महाविद्यालयातील/संस्थेतील प्रवेश क्षमतेच्या मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही.

| | | |
|---|---|---|
| 1. | अनु.जाती व अनु.जमातीमधील बौध्दधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | 13% |
| 2. | अनु.जमाती | 7.0% |
| 3. | विमुक्त जाती (14 तत्सम जाती) | 3.0% |
| 4. | भटक्या जामाती (जानेवारी 1990 पुर्वीच्या 22 तत्सम जती)एन.टी.1 | 2.5% |
| 5. | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती)एन टी.-2 | 3.5% |
| 6. | भटक्या जमाती (बंजारी व तत्सम जमती) एन.टी.-3 | 2.0% |
| 7. | ओ.बी.सी.व विशेष मागास प्रवर्ग | 19% |
| | | 50% |

Scanned by CamScanner

उ) 15 % विशिष्ट अखत्यारितील प्रवेश खालील प्रमाणे नियमित राहतील.
(बी.सी.एस., बी.सी.ए. व बी.बी.ए. ह्या अभ्यासक्रमांना वगळून )

1) शिक्षणसंस्था 5 %
2) महाविद्यालय प्रवेश समितीच्या सुचने नुसार-प्राचार्य 5 %
3) क्रीडा व संस्कृतीक क्षेत्रात विशेष नैपुण्य संपादन केलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी 5 %

ऊ) स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, अपंग, माजी व आजी सैनिकांचे पाल्य व प्रकल्प ग्रस्तांचे पाल्य यांच्यासाठी विहित प्रवेश क्षमते व्यतीरिक्त 2% वाढीव जागांवर प्रवेश देता येतो.

ए) प्रवेश देतांना शक्यतो शाखा बदलीस अनुमती देऊ नये.

<u>द्वितीय भाषा विषय व ऐच्छिक विषय प्रवेश</u> :-

द्वितीय भाषा विषय व गटनिहाय ऐच्छिक विषयांसाठी प्रवेश देतांना महाविद्यालयात सुरु असलेल्या कोणत्याही विषयावर विपरीत परीणाम होणार नाही या विषयी प्राचार्यांनी स्वत: दक्षता घेणे आवश्यक आहे. गरज भासल्यास विशिष्ट विषयांसाठी प्रवेश संखेवर बंधन घालणे अवश्यक राहील.

प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्राचार्यांनी वर्गनिहाय अंतीम यादी विद्यापीठ कार्यालयास पाठविणे बंधनकारक राहील.

टिप :- महाविद्यालयाने शक्यतो आपापल्या परिसरातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

संचालक

**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

प्रत [illegible]

1) सर्व शैक्षणिक/प्रशासकीय विभाग प्रमुख, प्रस्तुत विद्यापाठ
2) प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहितीस्तव-

1) मा.कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ.
2) मा.कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ.

Scanned by CamScanner

Gram: "Dnyanteerth"

तार :- "ज्ञानतीर्थ "

Swami Ramanand Teerth
Marathwada University
"Dnyanteerth" Vishnupuri
NANDED- 432 606 (M.S.)

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ
" ज्ञानतीर्थ " विष्णुपुरी
नांदेड- 431 606(महाराष्ट्र )

परीपत्रक क्र.1 शैक्षणिक/पदव्युत्तर/प्रवेश/2002-2003/

## विद्यापीठ संकुल / महाविद्यालयातील व्यावसायीक/अव्यावसायीक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष 2002-2003 साठीच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठीची विद्यापीठाची एकरुप नियमावली

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये, संकुल परीसरातील विविध विभाग व कार्यक्षेतातील विविध शैक्षणिक संस्था यातील पदव्युत्तर स्तरावर माहिती व तंत्रज्ञानावर आधारीत व्यावसायीक अभ्यासक्रम तसेच अव्यावसायीक पारपांरीक अभ्यासक्रमांचे केंद्रीय प्रवेश विद्यापीठातर्फे करण्यात येत होते. या प्रक्रीयेमध्ये महाविद्यालय स्तरावर आलेल्या विविध अडचणींची चर्चा मा. कुलगुरु यांच्याशी विविध प्राधिकरणामध्ये करण्यात आली. मा. कुलगुरु यांनी या सर्व संबंधितांशी साधक-बाधक चर्चा करुन हि प्रक्रीया महाविद्यालय/संस्था स्तरावर राबविण्यात यावी अशी सुचना केली आहे. ही प्रक्रीया शैक्षणिक वर्ष 2002-2003 या केवळ एका वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर लागु करण्यासाठी संबंधित प्राधिकरणांच्या वतीने मा. कुलगुरु यांनी मान्यता दिलेली आहे.

नियमावलीची एक प्रत या परीपत्रकासोबत अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने जोडण्यात आली आहे. सर्व संबंधितांनी या बाबीची नोंद घेवुन नियमांचे काटेकोरपणे पालन करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

विद्यापीठ प्रागंण *
विष्णुपूरी, नांदेड 431606 *
संदर्भ :- पदव्युत्तर/प्रवेश/2002-2003/5882-6019 *
दिनांक 18/05/2002 *

संचालक
म.वि.वि.म.

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव -**

1) सर्व शैक्षणिक/प्रशासकीय विभाग प्रमुख, प्रस्तुत विद्यापीठ
2) प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये प्रस्तुत विद्यापीठ

**प्रत माहितीस्तव-**

1) मा.कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ.
2) मा.कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, प्रस्तुत विद्यापीठ.

Scanned by CamScanner

## विद्यापीठ संकुल / महाविद्यालयातील
## ...यीक/अव्यावसायीक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी
## विद्यापीठाची एकरुप नियमावली

प्रवेश प्रक्रियेच्या या नियमावलीचे सर्व महाविद्यालयांनी काटेकोरपणे पालन करावे. प्र... प्रक्रियेच्या कालावधीत विद्यापीठाचे "प्रवेश प्रक्रिया दक्षता पथक" महाविद्यालयास/विभा... आकस्मीक भेट देतील. प्रवेश प्रक्रीया सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने या पथकास... संबंधितांनी सहकार्य करावे. या पथकाचे पदसिध्द् अध्यक्ष संबंधित विद्याशाखेचे अधिष्ठाता असतील व संबंधित अभ्यासमंडळाचे अध्यक्ष व विद्यापीठातील संबंधित विभागप्रमुख हे पद... सदस्य असतील. या समितीतील कोणीही सदस्य प्रवेश प्रक्रियेच्या काळात महाविद्यालयास... देणार असल्याने महाविद्यालयाने त्यांना प्रवेशाचा पूर्वनियोजित सविस्तर कार्यक्रम प्रवेश प्रक्रीय... कळविणे अनिवार्य आहे. महाविद्यालय/विभागाने या नियमावलीनुसार जाहीर करण्यात आ... प्रवेश वेळापत्रकानुसार कार्यवाही करावी. महाविद्यालयाने अभ्यासक्रमाबाबतची प्रवेश पुस्तिका आवेदन पत्रासह स्वतंत्रपणे छापावी त्यात ही नियमावली देखील छापावी. या प्रवेश पुस्ति... किंमत शासन नियमाप्रमाणे रू. 20 /- ठेवण्यात यावी. सर्व संबंधितांनी या बाबीची नोंद... विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

**पदव्युत्तर प्रवेशाचे वेळापत्रक :**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | प्रवेश सुचना जाहीर करणे | 10 जून 2002 |
| 2 | प्रवेश अर्ज माहितीपुस्तिकासह रु 20/- मध्ये महाविद्यालयातून उपलब्ध होण्याच्या दिनांक | 10 जून 2002 |
| 3 | प्रवेश अर्ज पोस्टाने अथवा समक्ष महाविद्यालयात दाखल करण्याचा अतिम दिनांक | 20 जून 2002 |
| 4 | प्रथम गुणवत्ता यादी जाहीर करणे | 24 जून 2002 |
| 5 | प्रथम गुणवत्ता यादीनुसार प्रत्यक्ष प्रवेश | 24-29 जून 2002 |
| 6 | दुसरी गुणवत्ता यादी जाहीर करणे | 2 जुलै 2002 |
| 7 | दुस-या गुणवत्ता यादीनुसार प्रत्यक्ष प्रवेश | 2-5 जुलै 2002 |
| 8 | रिक्त जागावर गुणवत्तेनुसार प्रत्यक्ष प्रवेश | 7 जुलै 2002 |
| 9 | प्रत्यक्ष तासीकांची सुरवात | 8 जुलै 2002 |
| 10 | गुणवत्ता निहाय प्रवेशितांच्या यादीस विद्यापीठाची मान्यता घेणे | 15 जुलै 2002 |

Scanned by CamScanner

3

3. सर्वसाधारण नियमः
3.1 सर्व प्रवेश हे गुणवत्तेच्या आधारेच देण्यात येतील.
3.2 उमेदवारांनी महाविद्यालयाने छापलेल्या माहिती पुस्तिकेतील नियम वाचूनच प्रवेश अर्ज भरावा.
3.3 उमेदवारांनी विद्यापीठाच्या या प्रवेश प्रक्रियेची व वेळापत्रकाची काळजीपूर्वक नोंद घ्यावी.

4. प्रवेश क्षमतेची विभागणी
4.1 एकूण प्रवेश क्षमतेच्या 70 टक्के जागांवर या विद्यापीठाची प्रथम पदवी संपादन केलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.
4.2 एकूण प्रवेश क्षमतेच्या 28 टक्के जागांवर या विद्यापीठाचे पदवीधर वगळून महाराष्ट्र राज्यातील अन्य अकृषी विद्यापीठे, कृषी विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रथम पदवी प्राप्त केलेले उमेदवार प्रवेशासाठी अर्ज करण्यास पात्र असतील.

4.3 एकूण प्रवेश क्षमते पैकी उर्वरित 2 टक्के जागांवर महाराष्ट्राबाहेरील मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या प्रथम पदवी प्राप्त उमेदवार प्रवेशासाठी अर्ज करण्यास पात्र असतील.

4.4 सैन्य दलातील आजी/माजी सैनिकांची मुलगा/मुलगी/पती/पत्नीसाठी राखीव जागेवर प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी इतर राज्यातील मान्यता प्राप्त विद्यापीठाची प्रथम पदवी प्राप्त केली असेल तर ते देखील वरील 28 टक्के जागा मधील त्यांच्यासाठी राखीव असलेल्या जागांवरच प्रवेशास पात्र ठरतील.

4.5 30 टक्के जागांसाठी विद्यापीठा बाहेरील उमेदवारांचे पुरेसे अर्ज न प्राप्त झाल्यास उर्वरित जागा या विद्यापीठ क्षेत्रातील यादीमधील उमेदवारातून गुणानुक्रमे भरल्या जातील. 2% जागांवरील प्रवेशासाठी राखीव असलेल्या जागाच्या केवळ खुल्या समजून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.
4.6 70 टक्के जागांसाठी विद्यापीठ क्षेत्रातील पुरेसे अर्ज जरी प्राप्त झाले नसले तर या जागावर महाराष्ट्रातील इतर मान्यता प्राप्त विद्यापीठाकडून प्रथम पदवी प्राप्त उमेदवारांचे प्रवेश होतील. या व्यतिरिक्त उर्वरित जागा शिल्लक राहिल्यास त्या जागा त्या शैक्षणिक वर्षासाठी रद्द करण्यात येतील. निर्धारीत वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेश देण्यात येणार नाही.

5. प्रवेश पात्रता :
5.1 या पुर्वी विद्यापीठाने संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी निर्धारीत केलेली शैक्षणिक पात्रता धारण करणे अनिवार्य आहे.
5.2 विद्यापीठ परीपत्रक क्रं.2/ACAD/Elig/Admn/Gen-Rules/2000-01/280-429 dt.15/6/2001 मधील नियम क्रं. 13 मधील उपकलम b,c,d,e 13.1 13.2 रद्द करण्यात आले आहेत.
5.3 कला, वाणिज्य व विज्ञान या पदवी स्तरावर अनिवार्य अथवा द्वितीय भाषा उत्तीर्ण असलेले पदवीधर त्या त्या संबंधित भाषा विषयासाठीच्या एम.ए. पदव्युत्तर प्रथम वर्गाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येतील.

Scanned by CamScanner

5.4 AICTE शी संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी या पूर्वी विद्यापीठाने निर्धा टक्केवारी पदवी स्तरावर असणे अनिवार्य आहे. इतर व्यावसायीक अभ्यासक्रम पारंपारीक अव्यावसायीक अभ्यासक्रमांसाठी या पुर्वी विद्यापीठाने पदव्युत्तर प्र प्रवेशासाठी निर्धारीत केलेली टक्केवारीची अट रद्द करण्यात आली आहे. त्यानुसार किमान पदवीधर असणे अनिवार्य आहे.

5.5 प्रस्तुत विद्यापीठाच्या पात्रता नियमांच्या अधिन राहूनच विद्यार्थी त्या संबंधित अ प्रवेशास विद्यार्थी पात्र असेल. या नियमावलीतील नियम हे अंतिमत: ग्राह्य असतील.

5.6 इतर विद्यापीठातील पदव्युत्तर प्रथम वर्ष उत्तीर्ण विद्यार्थी हे प्रस्तुत विद्यापीठात महाविद्यालयात पदव्युत्तर द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशास पात्रा राहणार नाहीत

## 6. राखीव जागांची तरतुद :

6.1 शासनाच्या प्रचलित धोरणानुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या 50 टक्के जागा मागासवर्ग घटकांसाठी खालील प्रमाणे राखीव राहतील. सदर आरक्षण महाविद्यालयतील/ संस क्षमतेच्या मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही.

| | | |
|---|---|---|
| 1. | अनु.जाती व अनु.जमातीमधील बौध्दधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | 13 % |
| 2. | अनु.जमाती | 7.0 % |
| 3. | विमुक्त जाती (14 तत्सम जाती) | 3.0 % |
| 4. | भटक्या जमाती (जानेवारी 1990 पुर्वीच्या 22 तत्सम जाती) एनटी1 | 2.5 % |
| 5. | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) एनटी - 2 | 3.5 % |
| 6. | भटक्या जमाती (बंजारी व तत्सम जमाती) एनटी - 3 | 2.0 % |
| 7. | ओ.बी.सी. व विशेष मागास प्रवर्ग | 19 % |
| | एकूण | 50 % |

6.2 भटक्या जमाती व तत्सम जाती धनगर, व तत्सम भटक्या जमाती बंजारी व तत्सम मागासवर्गीय उमेदवाराबाबत शासन निर्णय क्रमांक सीबीसी-1094/प्रक्र-86/मावक-5, 1994 नुसार निश्चित करण्यात आलेल्या उन्नत व प्रगत व्यक्ती /गट यांना या आरक्षित जागांसाठी पात्र समजले जाणार नाही.

6.3 राखीव जागांची तरतुद 70 टक्के व 30 टक्के जागांसाठी क्रमांक 6.1 मधील त राहील. आरक्षित संवर्गातील प्रवेश त्या संवर्गातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार देण्यात येई

6.4 खुल्या संवर्गातील 50 टक्के जागा व राखीव संवर्गातील 50 टक्के जागा अंतर्गत खालील संवर्गातील उमेदवारांना त्यासमोर दर्शविल्या प्रमाणे आरक्षण लागू राहील.

| | | |
|---|---|---|
| अ) | जिल्हा शल्य चिकित्सक यांनी प्रमाणपत्र दिलेले किमान 40 टक्के अस्थिव्यंग असलेले उमेदवार | 3 टक्के |
| ब) | सैन्यदलातील सक्रिय सेवेत असलेले व माजी सैनिक यांच्या कर्मचा-यांची मुलगे/ अविवाहित मुली व पत्नी/ पती | 2 टक्के |

Scanned by CamScanner

6.5 मागासवर्गीय उमेदवारांनी जातीच्या प्रमाणपत्राची सक्षम अधिका-यांनी साक्षांकित केलेली प्रत प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

6.6 राखीव जागा/आरक्षण संदर्भात अपूर्णांक संख्येबाबत पूर्णांक करण्यासाठी संबंधित महाविद्यालय/विभाग यांची प्रवेश समिती सक्षम असेल.

7. ***शैक्षणिक शुल्क/प्रवेश रद्द/परतावा :***

7.1 विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केलेले शैक्षणिक शुल्क विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात / विद्यापीठात प्रवेश घेतेवेळी जमा करावा. व त्याची रीतसर पावती घ्यावी.

7.2 प्रत्येक अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने शैक्षणिक शुल्क निश्चित करून दिलेले आहेत. हे शुल्क पुढील सुचना प्राप्त होईपर्यंत शैक्षणिक वर्ष 2002-2003 प्रमाणेच असेल. व याची सविस्तर माहिती महाविद्यालयाने माहिती पुस्तिकेत छापावी.

7.3 प्रथम अथवा दुस-या गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेशार्थीनी प्रवेश रद्द केल्यास शुल्कातुन 10 टक्के रक्कम कपात करून घेण्यात येईल. या साठी प्रवेश दिनांक 7 जुलै 2002 पुर्वी रद्द होणे अनिवार्य आहे अन्यथा शुल्काचा परतावा मिळणार नाही.

8. ***विशेष सूचना :***

8.1 प्रवेशासाठी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. प्रवेश निश्चितीसाठी उमेदवारांनी माहिती पुस्तिकेत नमूद केलेल्या दिनांकाच्या दिवशी विद्यापीठ/ महाविद्यालयातील सुचना फलक पाहणे आवश्यक आहे.

8.2 विद्यापीठाने निर्धारित केलेल्या विहित दिनांकानंतर शुल्क परतीचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

8.3 प्रत्यक्ष प्रवेशाचे वेळी मूळ कागदपत्रांची छाननी करतांना उमेदवाराने कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

8.4 प्रवेश प्रक्रियेची मुदत संपल्यानंतर कुठल्याही कारणाने प्रवेश दिल्या जाणार नाही.

8.5 अपूर्ण भरलेले अर्ज रद्द समजले जातील.

8.5 अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्र जोडले नसल्यास असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

8.5 आवश्यक प्रमाणपत्र जोडण्यासाठी उमेदवारास कुठलीही मुदत/ सवलती दिल्या जाणार नाही.

संचालक
म.वि.वि.मं

Scanned by CamScanner